जावक क्र.          /२०२०
मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे
न्यायालय, नांदेड
दिनांक २०.०५.२०२०

प्रती,
मे. पोलीस अधिक्षक,
जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय,
नांदेड.

विषय : जप्ती वाहनांचे अंतरीम ताबा बाबत......

याद्वारे आपणास कळविण्यात येते की, कोरोना संसर्ग प्रादुर्भाव टाळण्याकरिता महाराष्ट्र शासनाने दिनांक २३ मार्च, २०२० पासुन महाराष्ट्र राज्यात लावण्यात आलेल्या आचारसंहिता दरम्यान अनेक वाहने जप्त करण्यात आली असल्याचे आणि सदर वाहनांचे अंतरीम ताब्याबाबत या न्यायालयाकडे मौखिक तक्रारी येत आहेत. तसेच कोरोना या साथीच्या आजाराच्या पार्श्वभुमीवर माननीय नामदार उच्च न्यायालय मुंबई यांचे आदेशास अधिन राहुन दिनांक १८.०५.२०२० ते ३१.०५.२०२० या कालावधीत नांदेड जिल्हा न्यायीक विभागातील न्यायालयात नियमीत कामे केले जात नसुन केवळ रिमांड, जमानत आणि अत्यंत तातडीचे प्रकरणात सुनावणी होत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ८५ आणि ८६ तथा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०२ पोट कलम (३) अन्वये सदर वाहनांचा अंतरीम ताबा उपरोक्त नियमाचे अधिन राहुन पोलीस अधिक्षक अथवा पोलीस अधिक्षक यांनी नेमुन दिलेल्या तत्सम अधिकारी यांना क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सदर आचारसंहितेच्या कालावधीमध्ये जप्ती

करण्यात आलेली वाहने आणि ज्या वाहनाच्या अंतरीम ताब्याबाबत न्यायालयात दाखल नसलेल्या प्रकरणातील वाहनांचा अंतरीम ताबा नियमाप्रमाणे आपण देवु शकता. त्याबाबत माननीय नामदार उच्च न्यायालय मुंबई यांचे समोरील **इंद्रकुमार फरेदुन इरानी व इतर वि. महाराष्ट्र शासन व इतर {१९८९ (१)बॉम्बे सीआर ६०१}** या केस मधील न्यायनिर्णयाचे परिच्छेद क्र. ८ मध्ये नमुद केले आहे. करिता सदर वाहनाचे अंतरीम ताब्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी ज्यामुळे पक्षकारांना व वकीलांना लॉकडाउन दरम्यान न्यायालयात निष्कारण गर्दी करावी लागणार नाही व ये—जा करावी लागणार नाही.

(सतीश बा. हिवाळे)
मुख्य न्यायदंडाधिकारी, नांदेड.

<u>प्रतिप्रत:</u>

१. माननीय अतिरीक्त सह/दुसरे/तिसरे/चौथे/पाचवे मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड.
२. माननीय सह/दुसरे/तिसरे/चौथे/पाचवे/सहावे/सातवे/आठवे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, नांदेड.
३. माननीय दिवाणी न्यायाधीश क. स्तर, किनवट/ हिमायतनगर/ हदगाव/भोकर/उमरी/लोहा/कंधार/मुखेड/देगलूर/नायगाव/ धर्माबाद/माहुर/ अर्धापुर/ मुदखेड.
४. नांदेड जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्याचे सर्वश्री प्रभारी पोलीस अधिकारी.

(सतीश बा. हिवाळे)
मुख्य न्यायदंडाधिकारी, नांदेड.

प्रती,

माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, नांदेड यांच्या सेवेत माहितीस्तव आणि अवलोकनार्थ सविनय सादर.

(सतीश बा. हिवाळे)
**मुख्य न्यायदंडाधिकारी, नांदेड.**